जा.क्र./OW.No. 1102 /पोउआ/प्रकटीकरण /2022
पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),गुन्हे शाखा, मुंबई यांचे कार्यालय.
Office of the
DY.Commissioner of Police (Detection),
Crime Branch, Mumbai.
दूरध्वनी क्र. /Tel. No. 2262 1220
दिनांक/Date : 17/09/2022

प्रति,

प्रभारी पोलीस निरीक्षक,
पोलीस परिपत्रक कार्यालय,
मुंबई

विषय :– Best Detection of the Month JULLY – 2022 ''उत्कृष्ट गुन्हे शोध'' व Best Conviction of the Month JULLY – 2022 ''उत्कृष्ट अपराधसिध्दी'' पोलीस नोटीस व वेबसेल मध्ये प्रसिध्द करणेबाबत...

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे वतीने मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी, अंमलदारांना बेस्ट डिटेक्शन/बेस्ट कनव्हिक्शन/बेस्ट रिकव्हरी ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध, उत्कृष्ट अपराधसिध्दी याकरीता प्रत्येक महिन्याला निवड करण्यात येते.

माहे जुलै–२०२२ करीता '' **बेस्ट डिटेक्शन अर्थात ( उत्कृष्ट गुन्हे शोध ) तसेच बेस्ट कनव्हिक्शन अर्थात ( उत्कृष्ट अपराधसिध्दी)** '' याकरीताचे खालील नमुद पोलीस ठाणे याची निवड करण्यात आलेली आहे. तरी सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

**अ) माहे जुलै – २०२२ करीताचे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ –**

१) गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष–०६, गुन्हे शाखा, मुंबई, गु.र.क्र. १०२/२०२२,कलम ३७९, ४२०, १२०(ब),४११,४१३,भा.द.वि सह कलम ८(क) सह कलम २०(ब)(२)(ब),२९ एन.डी.पी.एस ॲक्ट सह कलम ६५(ई) महाराभट्र दारूबंदी अधिनियम सह कलम ४,२५ भारतीय हत्यार कायदा सह कलम ३७(१), १३५ म.पो.का

२) डि.बी. मार्ग पोलीस ठाणे, परिमंडळ–०२, मुंबई गु.र.क्र.३६३/२०२२,कलम ३०२,भादवि

**ब) माहे जुलै– २०२२ करीताचे बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ –**

१) भायखळा पोलीस ठाणे, परिमंडळ – ०३, गु.र.क्र. ७४/१८ कलम ३७६,३७७,५०६(२), ३२३, ५०४ भा.द.वि.सह बालकांचे लैगिंक छळापासुन संरक्षण अधिनियम २०१२ कलम ४, ८, १०,१२

सदर उत्कृष्ट गुन्हे शोध (बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ) व उत्कृष्ट अपराधसिध्दी (बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ ) बाबतची माहिती सोबत जोडण्यात आली असून सदरची माहिती पोलीस नोटीस व मुंबई पोलीसांचे वेबसेल वर प्रसिध्द करण्यात यावी.

सही/–
पोलीस उप–आयुक्त (प्रकटीकरण),
(अति.कार्य) गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई.

प्रत:–
वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वेबसेल, पोलीस आयुक्त कार्यालयाचे आवार, मुंबई.

<u>मजकुर :—</u>

दिनांक १५/०९/२०२२ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने " **Best Detection of the Month** " माहे जुलै—२०२२ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## <u>(अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ जुलै—२०२२</u>

| | | |
|---|---|---|
| ०१ | कक्ष — ६, गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई. | गु.र.क्र.गु.प्र.शा. गु.र.क्र. १०२/२०२२, कलम ३७९, ४२०, १२०(ब) ४११, ४१३, भा.द.वि सह कलम ८ (क) सह कलम २०(ब)(२)(ब) २९ एन.डी.पी.एस ॲक्ट सह कलम ६५ (ई) महाराभट्र दारूबंदी अधिनियम सह कलम ४, २५ भारतीय हत्यार कायदा सह कलम ३७(१), १३५ म.पो.का |

—: <u>" चोरीचे मोबाईल आर्थिक फायदयासाठी परदेशात विक्री "</u>:—

<u>**गुन्हयाची थोडक्यात हकिकत**</u> :— नमुद गुन्हयात आरोपींनी फौजदारीपात्र कट रचुन मुंबई शहर व इतर ठिकाणाहून त्यांचे साथीदार हे चोरी केलेले एकुण ७२,००,०००/ किंमतीचे ४८० मोबाईल चोरीचे असल्याचे माहित असुनही ते नित्यश: स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी व पुढील विक्रीसाठी स्विकारले व त्यात तांत्रिक बदल करुन फेरफार करून मोबाईलच्या मुळ मालकांची फसवणुक केली तसेच त्यांनी एकुण ९ किलो ५९० ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमलीपदार्थ व दारुच्या देशी व विदेशी कंपनीच्या एकुण १७४ बॉटल्स तसेच मोबाईल व इतर मुददेमाल मिळून असा एकुण ७५,४९,५२२/— रूपये किंमतीचा मुददेमाल विक्री करीता स्वत:च्या कब्जात बाळगला. तसेच हत्यार बंदी मनाई आदेशाचे उल्लंघन करून दोन तलवारी स्वत:च्या ताब्यात बाळगले म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री संभाजी विठठल कोळेकर वय ३४ वर्षे |
| हसतगत माल | :— | १) ६२९ मोबाईल फोन कि.रू. ७२,००,०००/—<br>२) लिनोओ कंपनीचा लॅपटॉप कि.रू. २५,०००/—<br>३) ९ कि.५६१ ग्रॅम वजनाचा गांजा अंमली पदार्थ कि.रू. २,३७,०००/—<br>४) देशी—विदेशी दारू कि.रू.१२,३१२/रू.<br>५) २ तलवार, कि.रू. १०००/—<br>६) हिटर मशीन व हिटर गन कि.रू. २३१०/रू.<br>एकूण ९७,५९,५२२/— रू. व रोख रक्कम ७१,०००/रू. |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) मेहबुब बद्रीन खान,३७ वर्षे,<br>२) फैयाज अकबर बादशा शेख, वय—३१ वर्षे,<br>३) आसीफ इद्रिस कुरेशी, २७ वर्षे,<br>४) दस्तगीर मदार सैय्यद, ४२ वर्षे,<br>५) अब्दूल वाहिद अब्दूल गफूर खान उर्फ बंटाय, वय ४९ वर्षे,<br>६) शाम पूर्णमादी सपकोट, वय २९ वर्षे,<br>७) इरफान अस्लम शेख, वय २८ वर्षे,<br>८) आयुब जाफर खान, वय २९ वर्षे,<br>९) कादरअली मोईद्दिीन सय्यद उर्फ चॉद, वय ३१ वर्षे,<br>१०)अब्दूल जब्बार अजीज शेख उर्फ जब्बार खाडी, वय ३८ वर्षे,<br>आरोपी अटक दि. १५/०७/२०२२ ते दि. १२/०८/२०२२ रोजी पर्यंत |

**तपास कौशल्य** :— दिनांक ३० जून २०२२ रोजी कक्ष ६ कार्यालयात नेमणुकीस असलेले पो.शि.क्र. ०८०२९६/कोळेकर यांना एक इसम चोरीचे मोबाईल खरेदी करीत असल्याबाबत एक गोपनीय बातमी प्राप्त झाली होती. मिळालेल्या बातमीची शहानिशा करून, बातमीच्या मुळाशी जावून संपूर्ण टोळी व जास्तीत—जास्त चोरीचा माल हस्तगत करणे या उद्देशाने कक्ष कार्यालयात दोन गोपनीय पथक तयार

करण्यात आले. त्यापैकी एक पथक तांत्रिक विश्लेषण करून, आरोपीच्या मोबाईलद्वारे अप्रत्यक्षपणे आरोपीच्या संपर्क कक्षेच्या कार्यक्षेत्राचा सातत्याने अभ्यास करीत होते.

त्याचवेळी दुसरे पथक आरोपीचे कार्यक्षेत्र असलेल्या महाराष्ट्र नगर, मानखूर्द, मुंबई परीसरात स्वत: व बातमीदारांमार्फत निगराणी करीत होते. आरोपी इसमाचे साथीदार कोण आहेत? चोरीचे मोबाईल कोणाकडून खरेदी होते? चोरीचे मोबाईल कोठे साठवणुक करतात? चोरीचे मोबाईल विक्री कोठे आणि कशी केली जाते? अशी माहिती मिळविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत असताना, आरोपी चोरीचे मोबाईल खरेदी करून, चोरीचे मोबाईल मानखूर्द परीसरातील महाराष्ट्र नगर, झोपडपटटी मधील एका घरात संकलित करीत असल्याची माहिती मिळाली.

दिनांक १५/०७/२०२२ रोजी आरोपी २०० ते २५० चोरीच्या मोबाईलची परराज्यात विक्री करणार असल्याबाबत ठोस माहिती प्राप्त करून, तात्काळ मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली आरोपीचे राहते निवासस्थानी नियोजनपूर्वक छापा टाकून कायदेशीर कारवाई करण्यात आली आणि त्याअनुषंगाने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नमूद गुन्हयात एकूण ४८० मोबाईल फोन (ज्यामध्ये नामांकित व महागडया ४१ ॲपल कंपनीच्या मोबाईल फोनचा समावेश आहे.) ,९ कि. ५०० ग्रॅ. गांजा, १७४ देशी—विदेशी बाटल्या, ०२ तलवारी असा एकूण ७४ लाख ७८ हजार रू. किमतीचा मुद्देमाल हस्तगत आणि रोख ७१,०००/रू. हस्तगत करण्यात आले आहेत. नमूद गुन्हयात मुख्य आरोपीस बुलंद शहर,उत्तर प्रदेश राज्यात पोलीस पथकांना पाठवून जेरबंद केले आहे. त्यानंतर तपासामध्ये एकूण १२ आरोपींना अटक करण्यात आली असून, एकूण ६२९ मोबाईल एकुण किंमत ९७,५९,५२२/— रूपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आले आहेत.

नमूद गुन्हयाच्या तपासा दरम्यान आजपावेतो विविध पोलीस ठाणेस दाखल १० गुन्हे आणि २२ मिसिंग प्रकरण उघडकीस आले असून, भविष्यात जास्तीत—जास्त गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. कक्ष ६ कार्यालयाने भारताच्या विविध राज्यातून /शहरातून चोरी केलेले मोबाईल तसेच पिक पॉकेट केलेले, चोरीचे मोबाईल स्विकारून ते परराज्यात/परदेशात पाठवणारी टोळी असून ते मोबाईल पॅकिंग करून पाठवण्याच्या तयारीत असताना कारवाई करून मोबाईल चोरीच्या गुन्हयाची आणि गुन्हेगारांची मुंबई येथुन चोरी करून आगरताळा, राज्य त्रिपुरा मार्गे बांग्लादेशात मोबाईल पाठविणारी साखळी निष्पन्न करून आंतरराज्य टोळी उध्दवस्त केली आहे.

आरोपी इसमाकडे गांजा या अंमली पदार्थाचा साठा देखील मिळून आला असून, ०२ तलवारी मिळून आलेल्या आहेत त्याअनुषंगाने देखील तपास सुरू आहे

गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष—०६, गुन्हे शाखा, मुंबई, **तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | प्रभारी पोलीस निरीक्षक | श्री. रविंद्र आत्माराम साळुंखे | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | हणमंतराव महादेव ननावरे | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | प्रविणकुमार युवराम बंगार | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | सचिन गोविंद गावडे | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | म.सहाय्यक पोलीस निरीक्षक | मीरा कल्पेश देशमुख | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पोलीस उप निरीक्षक | रामदास तात्याबा कदम | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पोलीस उप निरीक्षक | संदीप आनंदा रहाणे | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पोलीस उप निरीक्षक | सुभाष चिंधु मुठे | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | स.फौ. १७८३ | विजय वसंत बेंडाळे | प्रशस्तीपत्रक |
| १० | स.फौ.२७५३५ | नितिन बंडू सावंत | प्रशस्तीपत्रक |
| ११ | स.फौ.२७८७१ | प्रकाश रामराव आव्हाड | प्रशस्तीपत्रक |
| १२ | स.फौ. ३९५९ | महादेव भगवान कुरडे | प्रशस्तीपत्रक |
| १३ | स.फौ.२९३६१ | सुहास चंद्रकांत देसाई | प्रशस्तीपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | पो.ह.क्र.३१७३४ | उज्वल दत्तात्रय सावंत | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.ह.क्र.९७०५४२ | विजय बबन झिलारे | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.ह.क्र.९८०६९७ | नितिन नामदेव तुपे | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.ना.क्र.०४०३६३ | विद्यानंद गोरखनाथ शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.ना.क्र.०४११३२ | विनोद प्रकाश गायकवाड | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.ना.क्र.३१००८ | अंकुश वामनराव वानखेडे | प्रशस्तीपत्रक |
| २० | पो.ना.क्र.०५०७४२ | दीपक सुकलाल मोरे | प्रशस्तीपत्रक |
| २१ | पो.ना.क्र.६१२९४ | राहुल विष्णु आराख | प्रशस्तीपत्रक |
| २२ | पो.शि.क्र.०८०२९६ | संभाजी विठ्ठल कोळेकर | प्रशस्तीपत्रक |
| २३ | पो.शि.क्र.६१७०३ | सुरेश ज्ञानू घेरडे | प्रशस्तीपत्रक |
| २४ | पो.शि.क्र.०७०४०० | संजय भस्कर भालेराव | प्रशस्तीपत्रक |
| २५ | पो.शि.क्र.०७०७७४ | दिगंबर आनंदराव माळवेकर | प्रशस्तीपत्रक |
| २६ | पो.शि.क्र.८०३३९ | अमोंल वसंत इंगळे | प्रशस्तीपत्रक |
| २७ | पो.शि.क्र.०९०६६४ | रणजित चंद्रकांत चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| २८ | पो.शि.क्र.०९०३१९७ | कृष्णा कनिराम पवार | प्रशस्तीपत्रक |
| २९ | पो.शि. क्र.०११०६४१ | समिर महेबुब शेख | प्रशस्तीपत्रक |
| ३० | पो.शि.क्र.०१११४०३ | विजय अशोक कदम | प्रशस्तीपत्रक |
| ३१ | म.पो.शि.क्र.०८१४२६ | संगीता तुळयिरराम अभंग | प्रशस्तीपत्रक |
| ३२ | पो.ना.चा.क्र.००६७४ | गणेश महादेव कदम | प्रशस्तीपत्रक |
| ३३ | पो.ना.चा.क्र.९८०७६५ | वसंत कृष्णा डाळे | प्रशस्तीपत्रक |
| ३४ | पो.ना.चा.क्र.३१५२४ | गोकुळ साहेबराव जायभाये | प्रशस्तीपत्रक |
| ३५ | पो.शि.चा.क्र.१७१३६५ | युवराज भास्कर पाटील | प्रशस्तीपत्रक |

| ०२ | डि.बी. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई परिमंडळ— २ | गु.र.क्र ३६३/२२ कलम ३०२ भा.द.वि. |
|---|---|---|

—:"मयताने आरोपीस केलेल्या मारहाणीमुळे राग येवुन खुन ":—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयात दिनांक २१/०६/२०२२ रोजी ०१.१७ वा वाजताचे सुमारास डॉ.दा.भ.मार्ग पोलीस ठाणे अपमृत्यू नोंद क्र.१८/२०२२ कलम १७४ सी.आर. पी.सी. मधील मयत इसम नामे श्री गजानन रामचंद्र पवार, वय ५५ वर्षे, धंदा— मासेमारी, रा.ठी. रूम नं ३, बॉम्बे गॅरेज जवळ, दादी सेठ लेन, मेहर बिल्डींग च्या मागे, बाबुलनाथ मुंबई याचा कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी डोक्यात दगड घालून त्यास जिवे ठार मारल्याने फिर्यादी श्री मनोहर गजानन पवार, वय ३५ वर्ष. यांनी दिलेल्या तक्रारावरून म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री मनोहर गजानन पवार, वय ३५ वर्ष, |
| बळीत व्यक्ती | :— | श्री गजानन रामचंद्र पवार, वय ५५ वर्षे, |
| आरोपी अटक व दिनांक | :— | सुरज रामसेवक यादव वय २३.वर्षे,<br>अटक दिनांक ०३/०७/२०२२ रोजी |

**तपास कौशल्य :—** सदर गुन्हा घडल्यानंतर मा. अप्पर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रादेशिक विभाग), मा.पोलीस उपायुक्त परीमंडळ २ श्री निलोत्पल, सहा पोलीस आयुक्त श्री रवी सरदेसाई याचे मार्गदर्शनाखाली, वपोनि प्रदीप खुडे,पो.नि.पांडुरंग सणस (गुन्हे) यांनी नमुद गुन्हा उघडकीस आणण्याच्या अनुषंगाने तात्काळ पोलीस ठाण्यातील कार्यरत अधिकाऱ्यांना मार्गदर्शक सुचना केल्या व गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने पोलीस पथकाची नेमणुक केली.

आरोपीत इसमाची कोणत्याही प्रकारची माहीती नसतांना गुन्हयाचा तपास चालू होता. त्याअनुषंगाने घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज पाहीले असता एक संशयीत इसम घटनेचे वेळी घटनास्थळावरून निघुन जाताना दिसुन आला. नमुद इसम हा घटनास्थळावर कोठुन आला याबाबत सी सी टी व्ही चे माध्यमातुन नमुद इसमाचा पाठीमागे पाठलाग केला असता नमुद इसम घटनेचे दिवशी मुंबई सेंट्रल स्थानकावरून आला असल्याचे माहीती मिळाली. नमुद आरोपीताचे खासगी फुटेजचे साहयाने शोध घेतला असता. तो रॉयल स्मार्ट फॅसिलिटी, ताडदेव याठिकाणी गेला असल्याचे दिसुन आला. सदरठिकाणी तपास केला असता. नमुद इसमाने सदर ठिकाणी एक दिवस सिक्युरिटी गार्डचे काम केले असल्याची माहीती मिळाली. तसेच अरोपीत इसमाचे आधारकार्ड मिळुन आले व एक मोबाईल नंबर मिळुन आला. त्याचा सीडीआर काढुन तो आनखी ४ मोबाईल क्रमांक वापरत असल्याचे समजले. नमुद सर्व मोबाईल क्रमांक महिन्यापुर्वीच बंद झालेले दिसुन आले. आधार कार्डवरून सदर अरोपीत इसमाचे नाव सुरज रामसेवक यादव रा ठी — नवलपुर, शहाडोल, मध्यप्रदेश असे असल्याची माहीती मिळाली. त्याप्रमाणे तात्काळ एक पथक आरोपीत इसमाचे गावी पाठविण्यात आले. परंतु अरोपीत इसम सदर ठिकाणी मिळुन आला नाही. पुर्वी सुरज यादव हा मुंबई येथे कचरा गोळा करत असे, ही छोटीशी माहिती प्राप्त झाली.

दरम्यान गुन्हा घडुन १० दिवस उलटुनही आरोपी मिळुन येत नव्हता, त्यामुळे सदर अरोपीताचा एल एन्ड टी कंपनी तसेच खासगी सी सी टी व्ही फुटेज याचे साहयाने अरोपी कोठे गेला याबाबत तपास चालु होता. नमुद इसम मरीनलाईन्स स्टेशनचे दिशेने गेला असल्याचे दिसुन आले. त्याप्रमाणे मरीनलाईन्स स्टेशनचे सी सी टी व्ही फुटेज तपासले असता नमुद इसम हा गोरेगाव लोकल पकडुन निघुन जात असल्याचे दिसुन आले. त्याप्रमाणे पुढील प्रत्येक स्टेशनचे सी सी टी व्ही फुटेज तपासले असता नमुद इसम हा गोरेगाव पर्यत कोणत्याच स्टेशनवरती उतरलेला दिसुन आला नाही. त्यानंतर सदर लोकल पुन्हा चर्चगेटचे दिशेने निघाली असता पुढील सर्व स्टेशनचे सी सी टी व्ही तपासले असता नमुद इसम हा बांद्रा स्टेशन येथे उतरत असताना दिसुन आला. बांद्रा येथे उतरल्यानंतर अरोपीत सुरज यादव हा बांद्रा वेस्ट या दिशेला निघुन गेला असल्याचे दिसुन आले.

आरोपी हा बांद्रा रेल्वे स्टेशन येथुन बाहेर पडताना दिसल्यामुळे बांद्रा पोलीस ठाणे व परिसरातील खाजगी सी सी टी व्ही फुटेज तपास केला असता,तो हिल रोड परिसराकडे जाताना दिसुन आला. परंतु पुढे सी सी टी व्ही फुटेजमध्ये तो मिळुन येत नव्हता. त्यामुळे पुर्वी मुंबईत कचरा गोळा करायचा या माहितीच्या आधारे बांद्रा ते खार परिसरातील अंदाजे १०० ते १५० भंगार

विक्रेते यांना विश्वासात घेवुन त्यांना आरोपीचा फोटो दाखवुन चौकशी केली असता, एक इसमाने त्यास ओळखले. त्याच्याकडुन आरोपी रोज सध्याकाळी गरीब निराधार इसमांना बांद्रा परीसरातील **‘हॉटेल बालाजी’** हिल रोड या परिसरात काही सामाजिक कार्यकर्त्यामार्फत मोफत जेवण दिले तेथे जेवायला येतो ही माहिती प्राप्त झाली.

त्याअनुषंगाने तेथे सापळा लावला असता, दि.०३/०७/२०२२ रोजी रात्रौ २०.०० वाजताच्या दरम्यान आरोपी सुरज यादव तेथे येताच पथकाने त्यास ‘हॉटेल बालाजी’ हिल रोड येथुन ताब्यात घेतले.

आरोपीकडे गुन्हयाचे संदर्भात चौकशी /तपास केला असता त्याचा गुन्हयातील पुर्ण सहभाग स्पष्ट झाल्याने त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे. सदर इसमास विश्वासात घेवून त्याच्याकडे आत्तापर्यंत चौकशीत त्याने दिलेल्या माहितीनुसार गोवा राज्य येथे अशाच प्रकारे डोक्यात दगड मारून त्याने एका इसमाचा खुन केल्याची माहिती प्राप्त झाली आहे. त्याबाबत गोवा पोलीसांना संपर्क केला असता, तेथील पोलीस पथक मुंबई येथे चौकशी हजर झाले. त्यांनी आरोपीकडे चौकशी केली असुन ते त्यांचेकडिल गुन्हयाचे अनुषंगाने अउघड खुनाच्या गुन्हयाचे अभिलेख तपासत आहेत.

गुन्हयातील तपासी पथकाने गुन्हयातील आरोपी हा अनोळखी व्यक्ती असतांना चिकाटीने विशेष तपास कौशल्याचा वापर करत सुनियोजीत पद्धतीने उपलब्ध माहितीच्या आधारे आरोपी ओळख पटविली. गुन्हयासबंधाचा आरोपीताचा कोणत्याही प्रकारचे नाव, पत्ता व ठावठिकाणा माहित नसतांना अतिशय कार्यक्षमतेने व उत्कृष्ठ व कौशल्यरित्या तपास करून सदर गुन्हयात नमुद आरोपी अटक करून गुन्हा उघडकीस आणला.

## डि.बी.मार्ग पोलीस ठाणे, तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री. प्रदीप रामचंद्र खुडे | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | पांडुरंग गेणुबा सणस | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | नितीन महेंद्र महाडीक | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | राजाराम शंकर पोळ | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पोलीस उप निरीक्षक | अभिजीत अजितराव देशमुख | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.ना.क्र.००१९१ | अशोक सदाशिव पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.शि.क्र.०९०१९४८ | प्रकाश आप्पासाहेब कोळी | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पो.शि.क्र.११०७१३ | दिपक रामचंद्र डावरे | प्रशस्तीपत्रक |

<u>मजकुर :—</u>

दिनांक १५/०९/२०२२ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या '' **BEST CONVICTION OF THE MONTH "** माहे जुलै २०२२ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ जुलै — २०२२

| | | |
|---|---|---|
| ०१ | भायखळा पोलीस ठाणे,मुंबई परिमंडळ—०३ | गु.र.क्र. ७४/१८ कलम ३७६, ३७७, ५०६(२), ३२३,५०४ भा.द.वि.सह बालकांचे लैगिंक छळा पासुन संरक्षण अधिनियम २०१२ कलम ४,८,१०, १२ |

—: ''<u>अल्पवयीन मुलीवर लैगीक अत्याचार</u>'':—

<u>गुन्हयाची थोडक्यात हकिकत</u> :— नमुद गुन्हयात यातील फिर्यादी वय—१६ वर्षे हिला तिचे सावत्र वडील/आरोपी नामे भरत रतीलाल मकवाना, वय—४९वर्षे, यांने तो फिर्यादीचा पालक असुन एकाच सामायिक घरात राहत असुन देखील फिर्यादी ही एकटी असताना तिचेशी लगट करून जवळीक साधुन फिर्यादीस, तिच्या आईस व भावास शिवीगाळ करून, हाताने मारहाण करून जिवे ठार मारण्याची धमकी देवुन फिर्यादीशी वारंवार जबरदस्तीने शाररीक लैंगिक संभोग केला व फिर्यादीच्या तोंडामध्ये आरोपीताने त्याचे लिंग देवुन अनैसर्गिक संभोग केला. तसेच फिर्यादीच्या गुप्त भागास स्पर्श करून अश्लील चाळे करून लैंगिक सतावणुक केली म्हणून फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंद करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | लहान मुलगी वय—१६ वर्षे |
| निकाल दिनांक | :— | दि.१८/०७/२०२२ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | भरत रतीलाल मकवाना, वय ४९ वर्षे<br>आरोपी अटक दिनांक .२९/०३/२०१८ रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | मा. अति.सत्र न्यायाधीश, कोट रूम नंबर ४०, सत्र न्यायलय, मुंबई यांनी नमुद आरोपीस दि. १८/०७/२०२२ रोजी सुनावणी दरम्यान १० वर्षे कैद व ५००० रु. दंड अशी शिक्षा सुनावली आहे. |

<u>तपास कौशल्य</u> :— नमुद गुन्हयात तपासी पथकातील पो.अधिकारी व अंमलदार यांनी अथक प्रयत्न करून, गुन्हा उघडकिस आणून सदर गुन्हयातील आरोपीविरूध्द भौतिक व रासायनिक पुरावे प्राप्त केले. नमूद गुन्हयातील आरोपीविरूध्द सबळ पुरावे प्राप्त करून विहित वेळेत मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. त्यानंतर सदर गुन्हयातील साक्षीदार, पंच यांना व्यवस्थितरित्या मार्गदर्शन करून मा न्यायालया समोर हजर केले. यातील तपासी अधिकारी यांनी गुन्हयाचा व्यवस्थितरित्या तपास करून सबळ पुरावे प्राप्त केले. तसेच साक्षीदार, पंच यांना भायखळा पोलीस ठाणेचे कोर्ट कारकुन यांनी विहित वेळेत मा. न्यायायलासमोर हजर केले त्यामुळे पंच व साक्षीदार यांनी दिलेल्या साक्षमुळे व प्राप्त रासायनिक पुराव्यामुळे सदर गुन्हयातील आरोपी विरूध्द दोष सिध्द झाल्याने मा. न्यायालयाने आरोपी भरत रतीलाल मकवाना यास १० वर्षे कैद व ५००० रु. दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर गुन्हयामध्ये उल्लेखनिय तपास करुन आरोपी भरत रतीलाल मकवाना याच्याविरूध्द सबळ पुरावे प्राप्त करून गुन्हयाचा उत्कृष्टरित्या तपास करून आरोपीस १० वर्षाची शिक्षा झालेली आहे. तपासी अधिकारी, त्यांना मदत करणारे मदतनीस, कोर्ट कारकुन व पोलीस अंमलदार यांनी आपल्या लौकीकास साजेशी कामगीरी करून आपले गुन्हे अपराध सिध्दीचे कौशल्य सिध्द केले आहे व जनमानसात मुंबई पोलीस दलाची प्रतीमा उज्वल केली आहे.

भायखळा पोलीस ठाणे, तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे

| अ. क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री. अशोक सुरगोंडा खोत | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | चिमाजी जगन्नाथ आढाव | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | रमेश हनुमंतराव मोरे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पो.शि.क्र.०८०३०० | मल्लिकार्जुन बमनिंग कोळी | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पो.ह.क्र.३१५४१ | संतोष भगवान सावंत | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.शि.क्र.०९०८०५ | संदिप पंजाबराव हुलगे | प्रशस्तीपत्रक |